ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ
द्वारा संचालित
# डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर

डॉ. खत्री महाविद्यालयात नवमतदार नोंदणी व जनजागृती अभियान संपन्न -
ज्ञानदीप शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूर द्वारा संचालित स्थानिक डॉ. खत्री महाविद्यालय, तुकूम, चंद्रपूर येथे राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दि. 26 ऑगस्ट 2023 रोजी नवमतदार नोंदणी आणि मतदार जनजागृती अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. एम. काकडे हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून चंद्रपूरचे सहाय्यक जिल्हाधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी मा. मुरूगानंथम एम. हे होते. यावेळी मा. आश्विनी मांजे उपजिल्हाधिकारी चंद्रपूर , तहसीलदार श्री. पवार साहेब, नायब तहसिलदार डॉ. सचिन खंडाळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.
सदर कार्यक्रमाचे आयोजन आगामी लोकसभा व विधानसभा 2024 च्या पार्श्वभूमीवर वय वर्षे18 वरील युवा मतदारांमध्ये जाणीव जागृती निर्माण होण्याचे हेतूने करण्यात आले. यावेळी महाविद्यालयात 30 विद्यार्थ्यांनी नवनतदार म्हणून नोंदणी केली. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.






डॉ. खत्री महाविद्यालय सभागृह
राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग व्दारा आयोजित
नवमतदार नोंदणी अभियान आणि मतदार जनजागृती
संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम
२०२३
नवमतदार नोंदणी अभियान

